# कृषि विभाग जि.प.जळगांव यांचे मार्फत राबविण्यात येणा-या योजना

## १. डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना(विघयो)

**योजनेचे उदेश** :-- अनुसुचित जाती/नवबौध्द शेतक-यांचे उत्पन्न वाढवुन त्यांचे जीवनमान उंचवण्यासाठी शेतीविषयक बाबींचे १०० टक्के अनुदानावर खालील विविध बाबींचा लाभ देवुन लाभार्थींचा आर्थिक स्तर उंचावणे.

**लाभाचे स्वरुप** :--

| अ.क्र. | बाब | उच्चतम अनुदान मर्यादा रु. | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १ | नवीन विहीर | २,५०,००० | १०० |
| २ | जुनी विहीर दुरुस्ती | ५०,००० | १०० |
| ३ | इनवेल बोरिंग | २०,००० | १०० |
| ४ | पंपसंच/सोलर पंप संच | २०,००० (१० अश्वशक्ती पर्यंतचे विद्युत पंप संच करीता) | १०० |
| ५ | विज जोडणी आकार | १०,००० | १०० |
| ६ | शेततळयांचे प्लास्टीक अस्तरीकरण | १,००,००० | १०० |
| ७ | सुक्ष्म सिंचन संच<br>अ. ठिबक संच<br>ब. तुषार संच | <br>५०,०००<br>२५,००० | ९० |

**लाभार्थी निवडीचे निकष** - या योजनेंतर्गत लाभार्थी निवडीसाठी अनुसुचित जातीतील शेतक-यांकडे **नविन विहिरींसाठी किमान ०.४० हे.व नविन विहीर व्यतिरिक्त इतर घटकांच्या लाभासाठी किमान ०.२० हे.शेतजमीन** आणि योजनेंतर्गत सर्व बाबींसाठी **कमाल मर्या.६.०० हे** आहे.

**योजनेचा लाभ घेण्यासाठी लागणारी आवश्यक कागदपत्र** :--

१)ऑनलाईन अर्ज (www.mahadbtmahait.gov.in),.

२) स्वतःचे नांवे, ७/१२ उतारा व ८ अ उतारा, ड-पत्रक (नगरपंचायत,नगरपालिका व महानगरपालीका क्षेत्रांबाहेरील)

३) म. तहसिलदार / प्रांत अधिकारी यांचा अनुसुचित जातीचा दाखला (सत्यप्रत)

४) म.तहसिलदार यांचा मागिल वर्षाचा उत्पन्नाचा दाखला (रु.१,५०,०००/- मर्यादेत) .

५) आधारकार्ड

६) आधारलिंक बँक खाते पुस्तक

. ७) ७/१२ उताऱ्यावर इत्तर हक्कदार असतील तर त्यांचे  कार्यकारी दंडाधिकारी समक्षचे संमतीपत्र १००/- च्या स्टॅम्पवर

८) १ मे २००१ नंतर ३ रे अपत्य झालेले नसल्याबाबतचा ग्रामसेवकाने दिलेला दाखला.

९) रेशनकार्ड झेरॉक्स

१०) ग्रामसभा ठराव.

**. योजनेचा लाभ घेण्यासाठी कोणाकडे संपर्क साधावा** :- कृषि विभाग, संबंधित पंचायत समिती